क्र.२/नसवि/महासभा/ ०२ /२०१६-२०१७
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ मे २०१६

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०२ /२०१६-२०१७

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **गुरुवार दिनांक १९/०५/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव.
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०१६ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दुःखवटयाचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिका क्षेत्रातील सांगली वॉर्ड क्र.३६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या नाविन्यपुर्ण योजनेमधून शास्त्री चौक येथील शाहू उद्यान येथे उभारण्यात येणाऱ्या वॉटर ATM ला छत्रपती शिवाजी महाराज जलकुंभ प्रकल्प असे नामकरण करणेची मागणी केली आहे. त्यानुसार महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०४/०५/२०१६ चे विषयपत्र.**

५. महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय,मिरज कडील हजरत ख्वॉजा शमनामिरा शॉपिंग सेंटर मधील शम्स एज्युकेशन सोसायटी यांच्या वापरातील दोन खोल्या नगररचना विभागाने निश्चित केले वार्षिक भाडे र.रु.४१,३०४/- मात्र भरणेचे अटीवर दर तीन वर्षांनी २०% भाडेवाढ करुन तसेच एक वर्षाचे भाडे अनामत म्हणून भरुन घेवून ९ वर्षाकरीता सदरच्या खोल्या भाडेपट्टयाने शम्स एज्युकेशन सोसायटी यांच्या नावे करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.२८/०३/२०१६ चे विषयपत्र.**

१६. महानगरपालिका हद्दीतील सांगली सि.स.नं.२२७० मधील खुली जागा क्षेत्र ११५३.७० चौ.मी. जागेमधील १०% जागा वाचनालयासाठी व देखभाल दुरुस्ती करणेसाठी ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय,सांगली यांनी भाड्याने मागणी केली आहे. त्यानुसार सहा.संचालक नगररचना विभाग यांनी सन २०१५ चे मुल्य दरानुसार निश्चित केले वार्षिक भाडे र.रु.३६,१५०/- मात्र (अधिक सेवाकर) व प्रतिवर्ष २०% भाडेवाढ दर ५ वर्षानी पुर्नमुल्यांकन करुन भाडे मुल्य सुधारीत करुन महापालिकेच्या शर्ती अटीनुसार योग्य त्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र करुन घेवून अधिनियमातील कलम ७९(ड) नुसार नऊ वर्षे मुदतीने भाड्याने देणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.१३/०४/२०१६ चे विषयपत्र.**

१७. महानगरपालिका उपकेंद्र दवाखाना क्र.४ अष्टविनायक नगर,कुपवाड येथे श्री.बिरु मारुती माने यांची जागा प्रतिमहा र.रु.११००/- प्रमाणे १० वर्षेकरीता भाडेतत्वाने महासभेच्या मान्यतेने सुरु करणेस मान्यता देणेत आलेली आहे. सदर उपकेंद्राकरीता नगररचनाकार मिरज यांनी निश्चित केले प्रमाणे दि.११/०६/२०१५ पासून श्री.बिरु मारुती माने यांचे मालकीच्या जागेमध्ये असलेल्या उपकेंद्र दवाखान्याकरीता प्रतिमहा र.रु.३,१७५/- मात्र प्रमाणे भाडे अदा होणेकामी निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे दि.११/०५/२०१६ चे विषयपत्र.**

१८. महानगरपालिकेच्या मिरज स.नं.९३५/२ब या हिस्स्याचे एकूण क्षेत्र २ हेक्टर १५ आर. पैकी रस्त्यात एकूण ६२९५.१९ चौ.मी.(६२.२०गुंठे) या पैकी पू.प. (३०.४८ मी.-१२ मी.) १८.४८मी. सरासरी रुंदीचे क्षेत्र विकास योजनेतील १०० फुटी रस्त्याने बाधित होत असून, या क्षेत्राच्या मोबदल्यात नुकसान भरपाई रक्कम श्रीमती भागिरथी विठ्ठल गवळी व इतर १ ते ६ यांचे तर्फे कुलमुखत्यार पत्रधारक श्री.भिवा बाबूराव माने यांना खाजगी वाटाघाटीने सहा.संचालक नगररचना सांगली यांचेकडून मुल्यांकन करुन घेवून र.रु.६९,५८,५८४/- मात्र नुकसान भरपाई आदा करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.११/०५/२०१६ चे विषयपत्र.**

१९. महानगरपालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेसाठी महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग,पूणे सन २०१५-१६ सालाची दरसूची दि.०१/०९/२०१५ पासून वापरणेस सार्वजनिक बांधकाम विभाग,पूणे यांनी मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ ची दरसूचीस व त्यास अनुसरुन महापालिका क्षेत्रातील विविध विकास कामांची अंदाजपत्रके तयार करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.२१/०४/२०१६ चे विषयपत्र.**

२०. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत सांगली येथील बालहनुमान कॉलनी भाग १ व २ येथे १७६ घरकुले बांधणेत येत आहेत. जे झोपडपट्टी धारक सातत्याने झोपडीत रहात असलेले मा.शासन निकषाप्रमाणे सन ०१/०१/२००० पर्यंतचे झोपडपट्टी धारक हे संरक्षण पात्र निकषास पात्र आहेत. त्यामुळे विषयपत्रात नमुद बालहनुमान कॉलनी मधील १० झोपडपट्टी धारकांना आंबा धोत्रे झोपडपट्टी मध्ये बांधणेत येत असलेल्या ९४ घरकुलामध्ये लाभ देणेस विचारार्थ व निर्णयार्थ आलेले **उपायुक्त (नादानिक) यांचे दि.१३/०४/२०१६ चे विषयपत्र**

२१. महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ (महा.२००७) नुसार किमान अग्निशमन सेवा शुक्ल आकारणेस व कलम १२(१) अन्वये प्रस्तावा मान्यतेसाठी महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडे पाठविणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (अग्नि व आर्णीबाणी) यांचे दि.१३/०४/२०१६ चे विषयपत्र.**

२२. महानगरपालिका अग्निशमन व आणीबाणी सेवा विभागाकडून पुरविणेत येणाऱ्या सेवांचे दर वाढ करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (अग्नि व आणीबाणी) यांचे दि.२१/०३/२०१६ चे विषयपत्र.**

२३. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

२४. मा.महापौर, यांचे संमतीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

प्र.महापालिका सचिव.
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

सूचना (पुरवणी) कार्यक्रम पत्रिका क्रमांक ०२/२०१६-१७

महापालिका सभा दिनांक १९/०५/२०१६ करीता.

गुरुवार दि.१९/०५/२०१६ रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतदादा पाटील सभागृह, मुख्यालय,सांगली येथे होणाऱ्या महापालिका सभेपुढे ठेवण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन "महापालिका सभेचे कामकाज" खंड १(ज) अन्वये खाली नमूद केलेल्या प्रस्तावाच्या सूचना मा.सदस्य यांचेकडून प्राप्त झाल्या आहेत.

१. मा.शिंदे आशा नितीन यांनी दिलेला प्रस्ताव:-

केंद्र शासनातर्फे राष्ट्रीय स्तरावर अर्जुन,द्रोणाचार्य व राज्य शासनातर्फे शिवछत्रपती पुरस्कार देण्यात येतात. सांगली जिल्ह्यास ग्रामिण भागासाठी सांगली जिल्हा परिषदेमार्फत वसंतदादा क्रिडा पुरस्कार देण्यात येतो. सांगली जिल्ह्यास उज्वल अशी क्रिडा परंपरा आहे. या उज्वल परंपरेत सांगली मिरज आणि कुपवाड शहराने सिंहाचा वाटा उचललेला आहे. १२५ वर्षे पेक्षा जास्त कालावधी झाला असलेल्या क्रिडा संस्था अविरतपणे बलोपसनेचे काम करीत आहेत.

शिवछत्रपती क्रिडा गौरव समिती मार्फत दि.१०/०४/२०१६ सांगली जिल्ह्यातील शिवछत्रपती क्रिडा पुरस्कार विजेत्यांचा सत्कार मा.श्रीमती जयश्रीताई पाटील,मा.आमदार जयंतराव पाटील, मा.आमदार सुधीरदादा गाडगीळ यांचे हस्ते करण्यात आला. त्यावेळी मा.आमदार जयवंतराव पाटील यांनी सदर भाषणामध्ये कै.मदन (भाऊ) यांनी जिल्ह्यातील अनेक क्रिडा संघटनेमध्ये अनेक पदे भूषवून क्रिडा क्षेत्राला नावलौकीक प्राप्त करुन दिला आहे. त्यांचे नाव अविरतपणे क्रिडा क्षेत्रात राहणेसाठी त्यांचे जयंती किंवा पुण्यतिथी वेळी महापालिकेतर्फे कै.मदन (भाऊ) पाटील क्रिडा गौरव पुरस्कार चालू वर्षापासून सुरु करावा अशी मागणी केली आहे. त्यानुसार महापालिकेतर्फे कै.मदन (भाऊ) पाटील क्रिडा गौरव पुरस्कार सुरु करणेस व तशी तरतुद कायमपणे अंदाजपत्रकात करणेकामी आलेला प्रस्ताव.

२. मा.पाटील संतोष शिवदास व मा.पाटील सुनिता संजय यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील तत्कालीन सांगली नगरपालिकेच्या हद्दीतील अनेक वर्षे माळबंगला चिंतामणीनगर या भागात मागासवर्गीय नागरीकांनी झोपडपट्टी वजा निवाऱ्यात वास्तव केलेले आहे. त्या लोकांना कायमचा निवारा म्हणून लोक आवास योजनेतून बांधीव घरे दिलेली आहेत.

सि.स.नं.४६२९,४६३० ते ४६३८,४६८४,४६९५,४७०३,४७०७ ते ४७१५,४७२७,४७३६, ४७४२,४६७८ मधील सर्व क्षेत्रामध्ये अनेक वर्षापासून गोरगरीब मागासवर्गीय नागरीकांचे गेली २५ ते ६० वर्षे वास्तव्य आहे. त्यांना मनपाच्या वतीने पाणी,लाईट,रस्ते या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. त्यांचे अनेक वर्षापासून सदरचे सर्व क्षेत्र घोषित झोपडपट्टी म्हणून शासन स्तरावर निर्णय होवून केंद्र शासन,राज्य शासन तसेच, महापालिकेच्या अनेक योजनांचा लाभ घेता यावा तसेच त्यांचे जीवन सुधारावे यासाठी मागणी आहे. त्याचा विचार होवून सदरची झोपडपट्टी ही घोषित झोपडपट्टी (स्लम झोपडपट्टी) म्हणून शासन स्तरावर प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेकामी विचारार्थ व निर्णयार्थ घेणेकामी आलेला प्रस्ताव.

३. मा.पेंढारी गुलजार अल्लाबक्ष यांनी दिलेला प्रस्ताव :-

महानगरपालिकेच्या वॉर्ड क्र.४ मधील स.नं.२५३,२५४ येथे माळी वस्ती परिसरातील नागरीक गेल्या ३०-४० वर्षापासून रहिवाशी आहेत. सदर भागास पूर्वीपासून माळी वस्ती म्हणून सोडीच ओळखले जाते. तसेच, माळी वस्ती या नावावर पत्रव्यवहार होतात. सदर भागातील नागरीकांची सदर भागास माळी वस्ती म्हणून नामकरण करणेबाबत मागणी केली आहे. यासाठी सदर भागास माळीवस्ती म्हणून नामकरण करणेस मान्यता मिळणेबाबत आलेला प्रस्ताव

४. मा.पाटील प्रशांत विजयकुमार यांनी दिलेला प्रस्ताव :-

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील कॉलेज कॉर्नर ते माधवनगर जकात नाका पर्यंतच्या रस्त्यास कै.मदनभाऊ पाटील मार्ग असे नामकरण करणेची मागणी केलेली आहे. स्व.मदनभाऊनी महानगरपालिका क्षेत्रामध्ये अनेक भरीव विकास कामे केलेली आहेत. त्यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात फार मोलाचे योगदान लाभले आहे. त्यांच्या कार्याचे स्मरण व्हावे याकरीता महापालिका क्षेत्रामध्ये कै.मदनभाऊंचे स्मारक तसेच त्यांचे नावे कला दालन इत्यादी उभे केली जात आहेत. त्यास अनुसरुन महापालिका कार्यक्षेत्रातील कॉलेज कॉर्नर व माधवनगर जकात नाका पर्यंतच्या रस्त्यास कै.मदनभाऊ पाटील मार्ग असे नामकरण करणेस मान्यता मिळणेसाठी विचारार्थ व निर्णयार्थ घेणेकामी आलेला प्रस्ताव.

५. मा.नायकवडी नाजीया इद्रिस यांनी दिलेला प्रस्ताव :-

मिरज येथील शिवाजी रोड हा राज्य महामार्ग म्हणून गणला जातो. या मार्गावर सातत्याने वाहतुकीचा ताण वाढत आहे. परिणामी रोज येथे अपघाताची संख्या वाढत आहे. अनेकांना आपला जीव गमवावा लागला असून, आजही हा रस्ता मृत्यूचा सापळा म्हणून बसस्थान ते पंचायत समिती पर्यंत अतिक्रमणे काढणेत आली असून, काही मालमत्ता धारकांची जागा देखील संपादीत करणेत आली आहे. या ठिकाणचे महावितरणचे विद्युत खांब देखील हटविणेत आले आहेत. रस्ता रुंदीकरणासाठी सदर जागा संपादीत करुन देखील दिर्घ काळ लोटलेला आहे. संपादित केलेल्या जागेवर रस्त्याचे डांबरीकरण अद्यापी केलेले नाही. त्यामुळे हा रस्ता रुंदीकरण करुन देखील वापरात आलेला नाही. त्यामुळे आजही जीवघेणी मालिका सुरु आहे. तरी संपादित केलेल्या जागेचे तातडीने डांबरीकरण करणे व रस्त्यास दुभाजक बसविणेबाबत प्रशासनास आदेशित करणेकामी आलेला प्रस्ताव.

महापालिका सचिव कार्यालय,
महापालिका मुख्यालय, सांगली.
दिनांक : १६/०५/२०१६.

महापालिका सचिव.
सांगली,मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०१

विषय क्रमांक :- ०१

मागील सर्वसाधारण महासभा दि.०९/०३/२०१६ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.१७४ ते ठराव क्र.२०२ हे सभागृहामध्ये वाचून दाखविण्यात आले. सदरचे कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महासभा लिपीक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०2

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे कर्मचारी कै.दत्तात्रय नाबू यादव यांचे दिर्घ आजाराने दि.११ मार्च २०१६ रोजी वयाच्या ५४ व्या वर्षी निधन झाले. त्यांची प्रकृती ठिक नसतानाही त्यांनी महापालिका सेवेत हजर राहून त्यांचे कर्तव्य चोक बजावलेले होते. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.पांडूरंग गंगाराम भिसे

अनुमोदक :- मा.राजेश विठ्ठल नाईक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०३

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

तत्कालीन मिरज नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष कै.शिवाजीराव धुळूबुळू यांचे वृद्धापकाळाने दि.०९ एप्रिल २०१६ रोजी निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

अनुमोदक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०४

विषय क्रमांक :- ०२

दु:खवट्याचा ठराव

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्तसो यांच्या मातोश्री मकबुलबी याकुबसाब कारचे यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या दु:खद निधनामुळे त्यांच्या कुटूंबाच्या दु:खात ही सभा सहभागी होत असून, त्यांच्या मृत आत्म्यास चिरशांती लाभो व सद्गती देवो अशी ही सभा ईश्वरचरणी प्रार्थना करीत आहे.

सूचक :- मा.जगन्नाथ बापू ठोकळे

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०५

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

आमच्या नेत्या श्रीमती जयश्री मदन पाटील वहिनी यांची कृषी उत्पन्न बाजार समितीवर निवड झालेबद्दल तसेच माजी उपमहापौर श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (मजलेकर) यांचीही कृषी उत्पन्न बाजार समितीवर निवड झालेबद्दल त्यांचेही सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्रीमती जयश्री मदन पाटील वहिनी आणि श्री.प्रशांत विजयकुमार पाटील (मजलेकर) यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

अनुमोदक :- मा.प्रशांत पायगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- **०६**

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

नुकत्याच महापालिकेच्या चारही प्रभाग समिती सभापतींच्या बिनविरोध निवडी होवून त्या निवडीमध्ये प्रभाग समिती क्र.१ मधून मा.पुरुषोत्तम ऊर्फ बाळासाहेब मुरलीधर काकडे यांची, प्रभाग समिती क्र.२ मधून मा.मृणाल चेतन पाटील यांची, प्रभाग समिती क्र.३ मधून मा.काचंन मस्तान भंडारे यांची तर प्रभाग समिती क्र.४ मधून मा.हसिना इलियास नायकवडी यांची सभापती पदी बिनविरोध निवड झालेने सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा त्यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.दिलीप तुकाराम पाटील

अनुमोदक :- मा.प्रदिप जगोंडा पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०७

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

संपूर्ण भारत देशामध्ये इराणी समाजातील पहिल्या न्यायाधिश म्हणून महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या परिक्षेमध्ये फिजा फिरोज इराणी व रुबीना नजीर मुजावर या उत्तीर्ण झाल्या आहेत. त्यांचे बालपण,शिक्षण इत्यादी सांगलीमध्ये झाले आहे. त्यांना लहानपणापासून त्यांच्या वडिलांचे मार्गदर्शन लाभले आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांच्या परिक्षेमध्ये फिजा फिरोज इराणी या उत्तीर्ण होवून, इराणी समाजातील पहिल्या न्यायाधिश झाल्याबद्दल मा.जयश्रीताई मदनभाऊ पाटील यांचे हस्ते सत्कार करणेत आलेला ~~आल्लेला~~ आहे. त्यांना मिळालेल्या यशामुळे सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा फिजा फिरोज इराणी व रुबीना नजीर मुजावर यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.संतोष शिवदास पाटील

अनुमोदक :- मा.रोहिणी सत्यजीत पाटील

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०८

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

दैनिक सकाळचे पत्रकार श्री.जयसिंग कुंभार यांना अरविंद बाबू देशमुख प्रतिष्ठान तर्फे राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देणेत आलेला आहे. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा श्री.जयसिंग कुंभार यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.बाळासाहेब जगन्नाथ गोंधळे

अनुमोदक :- मा.अश्विनी हेमंत खंडागळे

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ०९

विषय क्रमांक :- ०२

अभिनंदनाचा ठराव

महाराष्ट्र राज्यातील लातुर जिल्ह्यामध्ये भयान स्वरुपात दुष्काळ पडल्याने पाणी टंचाई मोठ्या प्रमाणावर निर्माण झाली. नागरिकांचे पाण्याविना मोठ्या प्रमाणावर हाल सुरु असताना, नागरीकांच्या मदतीसाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांनी केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयांच्या मदतीने तसेच, सांगलीचे जिल्हाधिकारी मा.शेखर गायकवाडसो व महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी तसेच ठेकेदार श्री.शशांक जाधव यांच्या सहकार्याने मिरज येथून रेल्वेने लातूर शहरास व लातूर जिल्हास पाणी पुरवठा करुन दुष्काळग्रस्त नागरीकांना न्याय दिला. त्याबद्दल सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या वतीने ही सभा मुख्यमंत्री मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, जिल्हाधिकारी मा.शेखर गायकवाडसो आणि ठेकेदार श्री.शशांक जाधव यांचे हार्दिक अभिनंदन करीत आहे.

सूचक :- मा.किशोर दादासो जामदार

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा.प्रशांत विजयकुमार पाटील

प्रशासकीय अधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- १०

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०६/०४/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिकेच्या मिरज येथील एस.टी.स्टॅन्ड ते शास्त्री चौक या रस्त्यास आयुष्यमती मुक्ताबाई आप्पा कांबळे असे नामकरण करणेकामी महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रामध्ये जाहिर निवेदन प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत सूचना व हरकती प्राप्त न झाल्याने, मिरज येथील एस.टी.स्टॅन्ड ते शास्त्री चौक या रस्त्यास आयुष्यमती मुक्ताबाई आप्पा कांबळे असे नामकरण करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ११

विषय क्रमांक :- ०५

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे दि.०१/०३/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगली कर्नाळ मुख्य रस्त्यावर असलेल्या पद्माळे फाटेच्या पूर्वेस महात्मा बसवेश्वर चौक असे नामकरण करणेची मागणी तेथील नागरीकांना व सन्मा.सदस्य श्री.शिवराज श्रीशैल्य बोळाज यांनी केली आहे. त्यानुसार महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा अंतिम मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर

मालमत्ता व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ७२

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (बांधकाम विभाग) यांचे दि.१९/०३/२०१६ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या सार्व.बांधकाम विभागाकडील सार्वजनिक कामे करणारे कंत्राटदार यांची नोंदणीची मुदत महासभा ठराव क्र.५९ दि.१८/०६/२०११ अन्वये दि.३१/०३/२०१६ अखेर होती. सदर मक्तेदारांना दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०२१ अखेर मुदतवाढ देणेस आणि सदर मक्तेदारांची मुदत संपली असल्याने मक्तेदारांना नव्याने नोंदणी करून घेणेस कालावधी लागणार असल्याने दि.३०/०६/२०१६ अखेर मुदतवाढ देणेस तसेच, महापालिकेकडून निविदा कार्यवाहीसाठी निविदा फॉर्म फी स्विकारली जाते. सदर निविदा फॉर्म फी आकारणी मध्ये २००७ पासून कोणताही बदल करणेत आलेला नसल्याने, महाराष्ट्र शासन परिपत्रानुसार निविदा फॉर्म फी ची सुधारीत आकारणी करणेस मान्यता मिळणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत बिषयी सभागृहा मध्ये सविस्तर चर्चा झाली चर्चेअंती ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिकेच्या नोंदणीकृत मक्तेदारांना दि.०१/०४/२०१६ ते दि.३१/०३/२०२१ अखेर मुदतवाढ देणेस ही सभा मान्यता देत असून, महापालिकेचे काही नोंदणीकृत मक्तेदार महापालिकेची कामे घेवून कामे वेळेत पूर्ण करत नाहीत त्यामुळे नागरीकांचे मधून तक्रारी येतात. त्यासाठी ज्या नोंदणीकृत मक्तेदारांचे नावे तीन पक्षा अधिक कामे मंजूर असून, ती अद्याप अपुर्ण आहेत अशा मक्तेदारांची नोंदणी करताना त्यांचेकडून कामे मुदतीत पूर्ण करणेचे हमीपत्र घेणेत यावीत अन्यथा त्यांची नव्याने नोंदणी करणेत येवू नये असे ही सभा आदेशित करीत आहे. तसेच, महापालिकेकडून निविदा कार्यवाहीसाठी महाराष्ट्र शासन परिपत्रानुसार निविदा फॉर्म फी ची सुधारीत आकारणी करणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

शहर अभियंता

महापालिका सचिव

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :-**१३**

विषय क्रमांक :- ०७

सोबतचे उपायुक्त (प्रभाग समिती क्र.०१) यांचे दि.२४/०७/२०१५ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये उत्सवाच्या वेळी रस्त्यावर उभारणेत येणारे तात्पुरत्या स्वरुपातले मंडप/स्टेज यामुळे रहदारीस अडथळा होवू न देणे तसेच ध्वनी प्रदुषणाबाबत नागरिकांच्या तक्रारींचे निवारण करणेसाठी प्रभावीरित्या सुविधा उपलब्ध करणे यासाठी निश्चित करणेत आलेली मार्गदर्शक तत्वांची, शर्तो-अटींची व जनहित याचिका क्र.१७३/२०१०, सिव्हील ॲप्लिकेशन क्र.१२४/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दि.१३ मार्च २०१५ व दि.२४ जून २०१५ रोजी दिलेल्या आदेशाची व शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार अंमलबजावणी करणेस खालील प्रमाणे सर्वपक्षीय समिती गठीत करणेस ही सभा मान्यता देत असून, सदर समितीने आपला वस्तुनिष्ठ अहवाल मा.महासभेसमोर सादर करणेत यावा असे ही सभा आदेशीत करीत आहे.

१. मा.महापौर	.	अध्यक्ष
२. मा.उपमहापौर	.	सदस्य
३. मा.सभापती स्थायी समिती	.	सदस्य
४.मा.गटनेता	.	सदस्य
५. मा.विरोधी पक्षनेता	.	सदस्य
६. मा.पक्षनेता (स्वा.आघाडी)	:-	सदस्य
७. सहा.आयुक्त,सांगली	:-	सदस्य सचिव

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

सहा. आयुक्त (सांगली)

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- ९७

विषय क्रमांक :- ०८

मा.शासन आदेशान्वये १३ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील प्राप्त अनुदानातून विनियोग करणेस महासभा ठराव क्र.७३ दि.२०/०८/२०१५ मध्ये बदल केलेला महासभा ठराव क्र.१५५ दि.०२/११/२०१५ हा रद्द करुन, मुळ ठराव क्र.७३ नुसार अनुदान वितरीत करणेस मान्यता देणेकामी दि.२०/०१/२०१६ रोजीच्या महासभेमध्ये ऐनवेळच्या विषयात ठराव क्र.१६२ हा पारित करणेत आलेला असून, सदरचा ठराव दि.०३/०२/२०१६-१०/०२/२०१६ रोजीच्या सभेमध्ये कार्यवृत्त कायम करताना वगळणेत आलेला आहे. प्रस्तुत विषयावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण २ महासभेचे कामकाज मधील कलम १(२) अन्वये विचार विनिमय होवून निर्णय घेणेकामी विषयांकीत प्रस्ताव सादर करणेत आला होता. प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. सभागृहामध्ये झाले चर्चेनुसार मा.शासन आदेशान्वये १३ वा वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील प्राप्त अनुदानातून विनियोग करणेस महासभा ठराव क्र.७३ दि.२०/०८/२०१५ नुसार अनुदान वितरीत करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच, सदर प्रस्तावातील प्रस्तावित कामे १३ वा वित्त आयोगातील शासन निकषानुसार असलेबाबत खात्री करुन व कामाची आवश्यकता पडताळणी करुन घेणेची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- १५

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य श्री.दिलीप तुकाराम पाटील यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडीचे सामाजिक कार्यकर्ते व मा.स्वर्गीय वसंतदादा पाटील यांचे निकटचे सहकारी तसेच काँग्रेस पक्षाचे निष्ठावंत कै.लक्ष्मण कल्लप्पा कुंभार यांच्या कार्याची सतत प्रेरणा मिळावी या उद्देशाने सांगलीवाडीतील नागरिकांनी कै.लक्ष्मण कल्लाप्पा कुंभार यांचे सांगलीवाडी प्रभाग क्र.१९ मधील कुंभार गल्लीला कै.लक्ष्मण कल्लाप्पा कुंभार गल्ली असे नामकरण करणेबाबत तेथील नागरीकांची वांरवार मागणी होत आहे. यासाठी सांगलीवाडी प्रभाग क्र.१९ मधील कुंभार गल्लीस कै.लक्ष्मण कल्लाप्पा कुंभार असे नामकरण करणे विषयी चर्चा होवून निर्णय घेणेकामी आलेला प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे सदर प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मा.सभा व्यवस्थापक

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- १६

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शिवराज श्रीशैल्य बोळाज यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील आर्यविन पुल ब्रीज लगत असणाऱ्या सरकारी घाटाजवळील दत्त मंदिर परिसरास कै.शेषाप्पा बोळाज असे नामकरण करणेबाबत या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

मा.सभा व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- १७

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य शिवराज श्रीशैल्य बोळाज यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका क्षेत्रातील कृष्णामाई रोडवरील कुंभार खिंड जवळील असणाऱ्या चौकास कै.प्रशांत खिलारे असे नामकरण करणेबाबत व या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :

अनुमोदक :

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर

व्यवस्थापक

महापालिका सचिव

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- १९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य पांडूरंग गंगाराम भिसे यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील सांगलीवाडी येथील प्रभाग क्रमांक १९ मधील भारती विद्यापीठ शेजारील पूर्व बाजूकडील इस्लामपूर रोडला जोडणाऱ्या चौकास राजे मल्हारराव होळकर चौक असे नामकरण करणेबाबत येथील स्थानिक रहिवासी नागरिकांची मागणी असून, नागरिकांच्या मागणीनुसार सदर चौकास राजे मल्हारराव होळकर चौक असे नामकरण करणेबाबत व या नामकरणासाठी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर प्रस्तावावर महासभेने निश्चित केले धोरणानुसार स्थानिक वृत्तपत्रात जाहिर इरादा प्रसिद्ध करुन सूचना व हरकती मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक -

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर

मालमत्ता व्यवस्थापक.

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :-१९

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य विष्णू आण्णासाहेब माने यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रातील कुपवाड शहरातील परिसरामध्ये कुठेही भाजी विक्रेते व फेरीवाले यांचेसांठी विक्री करणेसाठी स्थायी ठिकाण नाही व भाजी मंडई नाही. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत आहे. नागरिकांची कुपवाड शहरामध्ये भाजी मंडई व्हावी ही मागणी आहे. तरी, नागरिकांची गैरसोय दुर करणेसाठी कुपवाड येथील स.नं.२३५ या महानगरपालिकेच्या खुल्या जागेमध्ये फेरीवाला धोरणांतर्गत भाजी मंडई विकसीत करुन कुपवाड शहरातील भाजी विक्रेते व फेरीवाले यांचे स्थायी स्वरुपात पुर्नवसन करणे व त्याकामी येणारे अनुषंगिक खर्चास मान्यता देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. सदर प्रस्तावानुसार प्रशासनाने सदर सर्व्हे नंबर मध्ये भाजी मंडई विकसीत करणेस व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर,

मा.लमन्ना व्यवस्थापक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- 20

विषय क्रमांक :- १(ज)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महानगरपालिकेचे कामकाज मधील खंड १(ज) अन्वये सन्मा.सदस्य दिग्विजय प्रदिप सुर्यवंशी यांनी दिलेला प्रस्ताव स्विकृत करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रात दुचाकी व चार चाका गाड्यांना LBT हा महापालिका क्षेत्रात ३.५% होता व महापालिका क्षेत्राबाहेर ०.१०% होता. हा LBT ग्राहक भरत होते. त्या पद्धतीने दुचाकी व चार चाकी वाहन वितरक यांनी वरील प्रमाणे LBT भरलेला आहे. परंतु, LBT अधिकाऱ्यांनी वाहन उद्योजक महानगरपालिका क्षेत्राबाहेर गेलेस मिळणाऱ्या LBT चे नुकसान न होणेसाठी महापालिका क्षेत्रामध्येच ज्या वाहनांची विक्री झालेली आहे अशा विक्रीवर ०.१०% प्रमाणे LBT आकारणेचे व्यापाऱ्यांना आश्वासन दिलेले होते. परंतु C.A. पॅनेलने महापालिका क्षेत्राबाहेर होणाऱ्या वाहन विक्रीवरही संपूर्ण LBT आकारणीची नोटीस बजावली आहे. त्यामुळे मनपा क्षेत्राबाहेरील विक्रीस LBT ०.१०% लावण्याचा निर्णय झाला असताना वाहन व्यापाऱ्यांना संपूर्ण LBT आकारुन भरणेच्या नोटीसा पाठविणे हे चुकीचे असून, अन्यायकारक आहे. तरी, अशा वाहन व्यापाऱ्यांवर अन्याय होवू नये यासाठी संबंधीत विभागास योग्यते आदेश पारित करणेकामी निर्णयार्थ आलेला प्रस्तावावर प्रशासनाने सविस्तर अहवाल मा.महासभ समार सादर करावा असे ही सभा आदेशित करीत आहे

सूचक - ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- महापौर

(उप. बी. टी. आयोक्षक)

महापालिका सचिव

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- 29

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतची सूचना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १ (के) अन्वये ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये साहाबादप्रमाणे छ.शिवाजी महाराज यांची जयंती असून, त्याचे औचित्त साधून श्री.शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान, सांगली यांनी छ.शिवाजी महाराजांच्यावर आधारित विविध कार्यक्रम घेण्याचे आयोजन केलेले असून, शिवपाईका मार्फत हिंदवी स्वराज्य मानवंदना देणेत येणार आहे. यासाठी दि.०१/०५/२०१६ रोजी छ.शिवाजी क्रिडांगण हे विनामुल्य वापरणेस मागणी केलेली आहे. त्यांचे मागणीनुसार छ.शिवाजी महाराज यांची स्मृती कायम राहणेसाठी श्री.शिवप्रतिष्ठान हिंदूस्थान,सांगली यांना नाममात्र रु.रु.१०००/- भरुन घेवून, सदर क्रिडांगण उपलब्ध करुन देणेस ही सभा मान्यता देत असून, सदर क्रिडांगणाचा दैनंदिन खेळाडू व नागरीक यांचे वापराचा विचार करता सदर क्रिडांगणावर मोठ्या प्रमाणात हिरवळ व क्रिकेट मैदान आहे. अशा प्रकारच्या कार्यक्रमामुळे क्रिडागणावरील क्रिकेट मैदान व सभोवतालची हिरवळ खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यासाठी सदर क्रिडागणाचे कोणतेही नुकसान होणार नाही या प्रमुख अटीवर व झाल्यास ते पुर्ववत दुरुस्त करुन देण्याच्या अटीवर श्री.शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान,सांगली यांना दि.०१/०५/२०१६ रोजीच्या कार्यक्रमास छ.शिवाजी क्रिडांगण वापरास देणेस ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर.

महाप्रलिका सचिव
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०१ दिनांक :- २०/०४/२०१६

ठराव क्रमांक :- 22

विषय क्रमांक :- ऐन.

सोबतचे उपायुक्त (मालमत्ता विभाग) यांचे विषयपत्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील तरतुदीनुसार ऐनवेळच्या विषयात सर्वानुमते दाखल करुन घेवून ही सभा खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

महानगरपालिका हद्दीतील कुपवाड येथील सि.स.नं.१९२३ हा विकास योजनेनुसार प्रारुप कलम २६(१), ३०(१) व ३१(१) मध्ये दक्षिण पूर्व बाजूस नियोजीत रस्त्याचा चौक गोलाईने अंशत: बाधीत होत असून, उर्वरित भाग हा रहिवास विभागात समाविष्ठ आहे.

तत्कालीन कुपवाड ग्रामपंचायत असताना सदरची जागा ही यशवंतनगर गृहनिर्माण संस्था,माधवनगर सांगली यांनी रेखांकन मंजूरीमध्ये १०% खुली जागा सोडलेली आहे. त्याचे क्षेत्र ५५३९.५० चौ.मी.इतके आहे. सदरची खुली जागा चेअरमन,यशवंतनगर गृहनिर्माण संस्था यांनी विनामोबदला कब्जेपट्टी करुन ताब्यात दिलेली असून, सदर जागेस सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेचे नाव लागलेले आहे. सदर खुल्या जागेमधून कोणत्याही प्रकारचे बांधकाम अथवा विकास काम न करता, सदर जागेचा वापर फक्त रस्ता वापरासाठीच करणार असलेने सदर खुल्या जागेमधून पूर्व-पश्चिम ६.०० मी. रुंदीचा रस्ता दबडे प्लॉट मधील भूखंड धारकांनी वापरण्यास मिळणेची मागणी केलेली आहे.

सबब, सदर खुल्या जागेमधून पूर्व-पश्चिम ६.०० मी. रुंदीचा रस्ता तेथील नागरीकांना उपलब्ध करुन देणेस हरकत नसलेबाबतचा मा.सहा.संचालक नगररचना यांनी अभिप्राय दिलेनुसार सदर खुल्या जागेवर कोणतेही बांधकाम,कुंपनभित न करणचे अटीस अधिन राहून, विद्यमान बोळाच्या उत्तर हद्दीपासून दक्षिणेकडे ६ मिटर रुंदीचा पूर्व-पश्चिम रस्ता या जागेवर महापालिकेचा मालकी हक्क राखून, सदरची जागा तेथील भूखंड धारकांना सद्याच्या वहिवाटीप्रमाणे रस्त्याकरीता कायमस्वरुपी फक्त वापरणेस देणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

मालमत्ता अधिक्षक

अनुमोदक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

महापौर.